# आर्थिक सत्ता टिकविण्यासाठी

कार्बन वायू हवेत सोडण्याचे प्रमाण कमी करून हवामानबदल रोखणे खरे तर आवश्यक आहे. तरीसुद्धा असे करण्यास विरोध केला जात आहे. या विरोधामागे वेगवेगळी कारणे आहेत. त्यापैकी एक प्रमुख कारण असे की, त्यामुळे काही देशांना आपली आर्थिक व राजकीय सत्ता गमावण्याची भीती वाटत आहे. जगातील ऊर्जेचे प्रमुख साधन खनिज तेल व नैसर्गिक वायू आहेत. ज्या देशांकडे या गोष्टींचे साठे आहेत, असे देश आज सर्वाधिक श्रीमंत आहेत. हे देश, तसेच त्यांच्यावर प्रभाव असलेले अमेरिकेसारखे काही देश याच खनिज संपत्तीमुळे संपन्न आहेत. त्यांच्याकडे आर्थिक सत्ता आहे. त्यामुळेच जगाची राजकीय सत्तासुद्धा आहे. या सर्व गोष्टींना कारणीभूत आहे ते खनिज तेल व नैसर्गिक वायूच. या खनिज साठ्यांना जेवढे जास्त महत्त्व, तितकेच या देशांनाही महत्त्व आहे.



आता कार्बन वायूंचे प्रमाण कमी करायचे झाले तर खनिज तेल व नैसर्गिक वायू वापरण्याचे प्रमाण कमी करावे लागणार. या पदार्थांचा वापर करण्याऐवजी सूर्य, वारे अशा इतर गोष्टींमधून ऊर्जा निर्माण करावी लागेल. खनिज तेल व नैसर्गिक वायू वापरणे कमी केले तर खनिज तेल असलेल्या या देशांचे महत्त्व कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक सत्ता व जगावर असलेला प्रभावही कमी होऊ शकतो. त्यामुळेच हे खनिज तेल असलेले देश व अमेरिकेसारखे काही देश आपल्या स्वार्थासाठी कार्बन वायूंचे प्रमाण कमी करण्यास तयार नाहीत. ते त्याला विरोध करत आहेत. हवामानबदल झाले आणि पर्यावरणाचे नुकसान झाले तरी त्यांना देणे-घेणे नाही. त्यांना आपले आर्थिक स्थान टिकवून ठेवायचे आहे. अशाप्रकारे या प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत, तो वाटतो तितका साधा नक्कीच नाही.

---

प्रश्न- स्वतःची आर्थिक सत्ता टिकवून ठेवण्यासाठी कोणते देश खनिज तेलाच्या वापराला विरोध करत आहेत?

(उत्तर- रविवार,१६ नोव्हेंबरच्या अंकात)



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
**लोकसत्ता गाथा ज्ञानाची**


**मोबाईल चार्जरचा वापर झाल्यावर त्वरीत इलेक्ट्रीक स्विच बंद करा**

**कारण बिना मोबाईलचा चार्जर अनाठायी वीज खर्च करतो**



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
website:http://mpcb.mah.nic.in

गुरुवार, दि. १३.११.२००८ सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका.
तज्ज्ञ : डॉ. काटोले मुलाखत : रविराज गंधे